जा .क्र. तंशिविकापु/आस्था-३(अ)/परिपत्रक/२०१८/५०९९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६
दिनांक : ३०/११/२०१८

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**
**सर्व शासकीय संस्था व कार्यालये,**
यांना माहिती व कार्यवाहीसाठी

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.१६/आस्था/संगणकअर्हताप्रमाणपत्र/२०१८/२०७, दि. २८/११/२०१८

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्राचे व सोबत जोडलेल्या शासन पत्राचे अवलोकन करण्यात येवून विहीत प्रपत्रात संबधीत गट अ, गट ब आणि गट क मधील कर्मचा-यांची माहिती **दिनांक ५/१२/२०१८ पर्यंत या कार्यालयास** **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी.

**तसेच माहिती निरंक असल्यास तसे या कार्यालयास कळविण्यात यावे.**

**सोबत : संचालनालयाचे परिपत्रक व शासनाचे पत्र**

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१.

दूरध्वनी - ०२२ - ३०२३३४१६ / ४३६, २२६२०६०१, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७

E-mail :- desk16@dtemaharashtra.gov.in / internet :- www.dtemaharashtra.gov.in


क्र.१६/आस्था/संगणक अर्हता प्रमाणपत्र/२०१८/२०८

दिनांक: २८/११/२०१८

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर,

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
28 NOV 2018
आवक क्र. 11060


विषय:- संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने माहिती पाठविण्याबाबत...

संदभ:- उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र संकीर्ण- २०१८/प्र.क्र.०३/आस्था-२, दिनांक १७.११.२०१८.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यांत येते की, संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये व तत्सम संस्थामधील गट-अ, गट-ब आणि गट-क मधील जे शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांनी अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र विहीत मुदतीत अथवा अद्याप सादर केलेले नाही. अशा शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या शासन पत्रात नमुद केलेल्या तक्त्यामध्ये स्वतंत्रपणे भरुन या संचालनालयास तात्काळ सादर करण्यांत यावी, जेणेकरुन विहित वेळेत सदर माहिती शासनास सादर करणे शक्य होईल. (सोबत संदर्भाधीन पत्र जोडण्यात येत आहे.)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) श्री. अमोल उगलमुगले, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.३२. यांना माहितीसाठी सादर.
२) कार्यासने क्रमांक ४, ४अ, १२ मुख्य कार्यालय मुंबई यांना तात्काळ कार्यवाहीसाठी सादर.

आस्था ३(अ) तात्काळ सर्व संस्थाकडून माहिती मागवून संकलित करून संचालनालयास सादर करावे
२८/११/१८

## माहिती पाठविण्याचा नमूना

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पदनाम | पदाचा संवर्ग (गट-अ/ब/क) | विभागाचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | सुट दिली असल्यास तो दिनांक | कार्यवाही करण्यात आली आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

महाराष्ट्र शासन

क्र:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०३/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
४३१ विस्तार, ४था मजला, मंत्रालय, मुंबई- ३२
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१८
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

प्रति,

उपसचिव (मशि),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
कुलगुरु/कुलसचिव, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
संचालक (उच्च शिक्षण/तंत्र/कला/ग्रंथ संचालनालय), मुंबई.

विषय : संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने माहिती पाठविण्याबाबत.

उपरोक्त विषयांकित सोबत जोडलेले पत्र कृपया पहावे.

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील (खुद्द) व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय/कार्यालयातील व शैक्षणिक संस्थांमधील गट-अ, ब आणि क मधील ज्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र विहीत मुदतीत अथवा अद्याप सादर केलेले नाही, अशा शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती मुख्यमंत्री कार्यालयास देण्याकरीता या विभागास तात्काळ सादर करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

सहपत्र: वरीलप्रमाणे.

१७/११/१८

(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

श्री कोर्णे
२२/११/१८

२२-११-२०१८
१६

F:\Documents\Sushilkumar\१४_२०१८.docx

का १६
२०/११

महाराष्ट्र शासन

मातंस-२०१८/प्र. क्र. ५३/से-५/ का.३९
सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)
७ वा मजला , मंत्रालय (विस्तार) ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०८ ऑगस्ट, २०१८.

प्रति,

१. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
२. सहसचिव/उपसचिव सर्व मंत्रालयीन विभाग.

विषय:- संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने माहिती पाठविण्याबाबत..

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना "महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९, दिनांक २५.०१.१९९९.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सेप्रनि २००२/प्र.क्र.१४/०२/१२, दिनांक ०२ सप्टेंबर, २००३.

३) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती-०४/२२४/३९, दिनांक ०५ मे, २००७.

महोदय,

संदर्भीय शासन अधिसूचना व शासन निर्णयांचे कृपया अवलोकन करावे.

२. उपरोक्त नमूद संदर्भाधीन अधिसूचना क्र.१ अन्वये शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब, गट-क मधील अधिकारी/ कर्मचारी यांना शासकीय सेवेत रूजू झाल्यापासून दोन वर्षात संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यानंतर संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. तथापि, उपरोक्त संदर्भीय क्र.३ मधील शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब, गट-क मधील अधिकारी/ कर्मचारी यांना संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यास दिनांक ३१.१२.२००७ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. संदर्भ क्र. २ मधील विभागाच्या शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब, गट-क मधील वयाची ५० वर्ष पूर्ण केलेल्या शासकीय सेवकांस संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

३. आता, सदर प्रकरणी आणखी मुदतवाढ देण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच कर्मचारी संघटना यांची निवेदने विभागाकडे प्राप्त झालेली आहेत. त्यानुषंगाने कार्यवाहीसाठी आपल्या विभागातील व अधिनस्त कार्यालयातील गट-अ, गट-ब, गट-क मधील ज्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी अनिवार्य संगणक अर्हता प्रमाणपत्र विहीत मुदतीत अथवा अद्याप सादर केले नाही, अशा शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती या विभागास दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत या विभागास उपलब्ध करून द्यावी, ही विनंती.

आपला,

बा.स.खंदारे
८/८/२०१८

(बाबासाहेब स. खंदारे)

कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

सोबत: वरीलप्रमाणे